॥ ॐ ॥

# ‘स्व’-रूपवर्धिनी कार्यवृत्त

ऑक्टोबर २०२०

२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे - ४११ ०११.
(कार्यालय दूरध्वनी) : २६१२१७०४    भ्रमणध्वनी : ९०११३८६३८६
Email : wardhinee@gmail.com
Website : http://www.swaroopwardhinee.org




जय जगदंबे नमन तुला करितो मंगल आरतीला ।
भारत स्त्री हे प्रतीक तुझे शक्ती देवते ध्याऊ तुला, अष्टभुजे, जय जगदंबे... ॥
म्हणती पार्वती शक्तिला, सरस्वती तव बुद्धीला
महालक्ष्मी अन् वदती वैभवा, सकलतीर्थ तू, तू विमला ।
परब्रह्म तू, वरदहस्त तव जीवन देई विश्वाला ॥
त्रिगुणात्मक हे त्रिशुल करी, असुरगणांना संहारी
उन्नत डोलत विश्वशिरी, जो अजिंक्य राष्ट्रध्वज भगवा
गर्जे, त्यागी बनुनी चढवा, वैभवशिखरी राष्ट्राला ॥

# मागोवा कोरोनामधील कामाचा

'स्व'-रूपवर्धिनी हे ३६५ दिवस चालणारं आनंदालय आहे. सर्वत्र पसरलेल्या कोरोनाचे संक्रमण भारतातही झाले यामुळे याला आटोक्यात आणण्यासाठी एकत्र न येण्याचे, घरीच राहण्याचे बंधन आपल्या प्रत्येकाच्या हिताचे आहे हे ओळखून ते वर्धिनीच्या सर्व प्रकल्पांतील उपक्रमांनी आनंदाने स्वीकारले. आणि मग सर्वांनी आपली वर्धिनी, आपली शाखा, प्रत्येक घरात घेऊन जाण्याचा संकल्प केला.

या संकल्पाला सत्यात उतरविण्यासाठी 'विधायक बंदी' या नावाने मुख्य कार्यकर्त्यांचा एक क्रियाशील गट (Whatsapp Group) तयार केला गेला आणि मग सुरुवात झाली बंदीचे रुपांतर सुवर्णसंधीत करण्याची. तंत्रज्ञानाने दिलेली देणगी वापरून Skype, Zoom, Conference Call, Google meet अशा अनेक संसाधनांचा वापर करून virtual बैठका बार पडल्या. पालकांचे whatsapp group तयार झाले. रोज घरोघरी जाऊन केला जाणारा संपर्क आता फोन, व्हिडिओ कॉलच्या माध्यमातून सुरू झाला. एप्रिल महिन्यातील या उपक्रमाला मिळालेल्या उत्तम प्रतिसादामुळे कार्यकर्त्यांच्या उत्साह वाढला आणि म्हणूनच १ मे ते १० मे या कालावधीत शाखा विभागाने शाखाशः स्पर्धांचे आयोजन केले. तंत्रज्ञानाचा वापर करून उत्तमोत्तम आणि नाविन्यपूर्ण उपक्रम शाखा कार्यकर्त्यांच्या सहयोगातून तयार करून ते शाखेत सादर केले.

'स्व'-रूपवर्धिनीचे शिबिर म्हणजे उत्साह आणि आनंद या सहयोगातून फुलत जाणारी मैत्री. या वर्षी कोरोनाच्या बंधनामुळे ह्या शिबिराची तांत्रिक व्याख्या अनुभवता आली. युवक गटाची कल्पकता बहरून आली. शिबिरातील सहभागाचे वर्तुळ विस्तारले. पुणे शहराच्या बाहेरील मुलांसाठीसुद्धा हे शिबिर स्मार्ट फोनच्या साहाय्याने अनुभवता आले. मुलांना व्हिडिओ बनवणे, ऑनलाईन बैठका घेणे, कृतीयुक्त उपक्रमांत सहभागी होणे अशा अनेक तंत्रांची माहिती मिळाली. २३ मे ते ३१ मे २०२० या कालावधीत संपन्न झाले. त्या विविध शिबिरांमध्ये सुमारे १३०० ते १४०० मुलांनी सहभाग घेतला. दरवर्षी जून-जुलै या काळात होणाऱ्या युवा शिबिरात नव्या व्यवस्था प्रमुखांच्या प्रशिक्षणाने आपल्या कामाचा श्री गणेशा होतो. यात खंड पडू न देता शाखा विभागाने सर्व शाखांच्या व्यवस्था प्रमुखांची ऑनलाईन प्रशिक्षणे घेतली. यात सर्व शाखा उत्साहाने सहभागी झाल्या.

व्यवस्था प्रशिक्षण घेऊन सज्ज झालेल्या युवा गट प्रत्यक्ष मैदानात उतरला आणि सुरुवात झाली साप्ताहिक ऑनलाईन शाखेची. अशातच लॉकडाऊनचे काही निर्बंध उठवण्यात आले आणि पालक परत त्यांच्या रोजगारासाठी बाहेर पडू लागले. फोन उपलब्ध नसल्याने सर्व मुलांपर्यंत पोहोचणे कठीण झाले.

यावर उपाय म्हणून 'स्व'-रूपवर्धिनी अनौपचारिक शिक्षणावर भर देणारी 'वर्धन कृती पुस्तिका' तयार करण्यात आली. ''मैत्री'' या संकल्पनेवर आधारित असणारी ही कृती पुस्तिका योग्य ती खबरदारी घेऊन मुलांपर्यंत पोहोचविण्याला सुरुवात केली आहे.







## शाखा विभाग - शिक्षक दिन

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः। गुरुः साक्षात् परब्रह्म तस्मै श्री गुरुवे नमः ।।

यावरील पंक्तीप्रमाणे आपल्या जीवनात शिक्षकांचे अनन्यसाधारण महत्त्व आहे, शिक्षक हा काही फक्त विद्यार्थी घडवत नसतो तर तो आजूबाजूचा समाज पण घडवत असतो. उदा. ज्योतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सर्वपल्ली राधाकृष्ण, कृ. ल. पटवर्धन सर इ. हे सर्व हाडाचे शिक्षक होते. यांनी नुसता विद्यार्थी घडवला नाही तर विद्यार्थ्यांच्या माध्यमातून सामाजिक सुधारणा व त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी तसेच समाजातील सर्व घटकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी काय करता येईल यावर काम केले. समाजातील सर्वांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याची शिक्षकांमध्ये उपजत गुण व क्षमता असते. समाजाला जागृत करण्याची शक्ती असते. म्हणून ह्या दिवशी सर्व गुरुजनांना वंदन करून 'स्व'-रूपवर्धिनीने शिक्षक दिनाच्या दिवशी **'नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२०'** या विषयावर ऑनलाईन चर्चासत्र आयोजित केले होते. या चर्चासत्रात प्रथम डॉ. चित्रा सोहोनी यांनी माध्यमिक शिक्षणाच्या नवीन धोरणात काय आहे या विषयी मांडणी केली. PPT च्या माध्यमातून याची मांडणी केली. यातील काही मुद्दे, स्वयं अध्ययन, वंचित घटकांपर्यंत पोहोचण्यातील वास्तव व उपाययोजना, समन्वय, ५+३+३+४ हे धोरण म्हणजे काय ? पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक (Preparatory, Middle & High School) हे टप्पे, आवडीचे विषय निवडण्याचे स्वातंत्र्य, शिक्षण हक्क कायदा ३ ते १८ वयोगटासाठी, मातृभाषेतून शिक्षण, सातत्यपूर्ण मूल्यमापन, नाष्टा आणि भोजनाचा समावेश, बहुआयामी शाळा.

विषयाचा समारोप करताना त्या म्हणाल्या, 'नवीन शिक्षण पद्धती हे एक सुंदर स्वप्न आहे. ते प्रत्यक्षात उतरवणे आव्हानात्मक आहे.'

मा. प्रा. अनिरुद्ध देशपांडे यांनी या नवीन शिक्षण पद्धतीत वंचित उपेक्षित घटकांसाठी काय आहे याची मांडणी केली. यातील काही मुद्दे - शिक्षण हा परिवर्तनातील 'मैलाचा दगड' असल्याने गतिमान ज्ञानसमाजाचे भान ठेवणे आव्हानात्मक आहे, समाजातील वंचितांना सहज उपलब्ध होणारे सर्वसमावेशक व योग्य शिक्षण हवे, वंचितांमधील गळतीचा विचार (Dropouts) करून १० वर्षांमध्ये तो शून्यावर आणण्याचे लक्ष्य, मातृशक्तीच्या शिक्षण आणि आरोग्यावर भर.

ते म्हणाले, "भाषेची निवड हा व्यक्तीचा अधिकार आहे ह्या न्यायालयीन निर्णयाचा विचार करून मातृभाषेतून शिक्षण ह्याचा आग्रह व पारंपारिक उद्योगांना नवीन ऊर्जा देण्याचा प्रयत्न या शैक्षणिक धोरणात केला आहे. काही संस्थांनी सृजनशीलतेने यातील काही बाबींचा उपयोग शाळेत केला आहे. त्याचा फायदा मुलांना होत आहे. त्यामुळे सर्वांनीच या नवीन पद्धतीचा लाभ घ्यायला हवा असे वाटते."

❖❖❖

## महिला विभाग - रुग्ण सहाय्यक वर्ग

कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे २०२०-२१ चा नवीन वर्ग सप्टेंबर महिन्यात सुरू झाला. १० वी, १२ वीच्या निकालानंतर प्रवेशासाठी चौकशी सुरू झाली आणि ऑनलाईन पद्धतीने दि. १४ सप्टेंबर वर्गाचे उद्घाटन झाले. या कार्यक्रमाला के.ई.एम. परिचारिका महाविद्यालयाच्या प्राध्यापिका सौ. नेहाताई दिवे व टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या स्कील डेव्हलपमेंट विभागाचे समन्वयक श्री. धीरज सिंग सर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. सर्व कार्यक्रम गुगल मीटद्वारे घेण्यात आले. यात वर्धिनीच्या माहिती तंत्रज्ञान विभागाच्या युवक कार्यकर्त्यांची खूप मदत झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वर्गाच्या शिक्षिका कु. अतिषाताई भोसले, पाहुण्यांचा परिचय सौ. लता सतूर, प्रास्ताविक श्री. शिरिष पटवर्धन सर आणि आभार प्रदर्शन श्रीमती पुष्पाताई नडे यांनी केले. वर्गाचे माजी विद्यार्थी सौ. विद्या चंदनशिवे, श्री. भास्कर साखरे व कु. सुवर्णा हिलम यांची मनोगते सादर झाली. या सर्व उपक्रमांतून नवीन मुलींना वर्धिनीची व अभ्यासक्रमाची उत्तम ओळख झाली. सौ. नेहाताई मुलींना मार्गदर्शन करताना म्हणाल्या, "कोणत्याही रुग्णालयाची ओळख तिथे मिळणाऱ्या चांगल्या पद्धतीच्या उपचारांमुळे होते. इथे काम करणारी परिचारिका ही रुग्णालयाचे हृदय किंवा कणा असते. प्रत्येक क्षणाचे महत्त्व जाणून वेळेवर दिलेली सेवा खूप मोलाची असते. आपला अभ्यास मनापासून रस घेऊन करा, खोलवर माहिती घ्यायची सवय लावा. परदेशात सध्या परिचारिका रुग्णालय सांभाळतात त्याप्रमाणे आपल्यालाही सखोल अभ्यास करून काम करता आले पाहिजे, नित्य नवीन वापरण्यात येणाऱ्या तंत्रज्ञानाचा उपयोग करता आला पाहिजे."

## आमचे युवा-आमची ताकद



**सौ. विद्या चंदनशिवे** - विद्या २०१८-१९ च्या वर्गाची माजी विद्यार्थिनी. आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने हॉटेलमध्ये शेफचे काम करत चार जणांचं कुटुंब सांभाळताना धावपळ करत होती. तिच्या नणंदेकडून अभ्यासक्रमाची माहिती मिळाली. पहिले ३ महिने नोकरी व घर सांभाळून वर्गाला येत होती. पण के.ई.एम.हॉस्पिटलमध्ये प्रत्यक्ष काम सुरू झाल्यावर तिची तारेवरची कसरत सुरू झाली. त्यामुळे नोकरी सोडावी लागली. अनेक अडचणींना तोंड देत वर्ग जिद्दीने पूर्ण केला आणि उत्तम गुणांनी उत्तीर्ण झाली. लगेचच नोकरीही मिळाली. सध्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कोविड केंद्रातील अतिदक्षता विभागात ज्येष्ठ परिचारिका म्हणून काम करत आहे. रुग्णांना सेवा देताना वर्धिनीत झालेल्या उपक्रमांतून मिळालेले संस्कार खूप उपयोगी पडतात आणि याचे श्रेय ती सर्व शिक्षिका आणि वर्धिनीला देते.

## पाकोळी बालवाडी (पुणे, भेकराईनगर)



एप्रिल महिन्यापासून ऑनलाईन बालवाडी (मधला गट, मोठा गट) सुरू झाली. पण सुरुवातीला ही संकल्पना जरा अवघडच वाटत होती. अभ्यासक्रमातील पाठ घेताना साहित्याची कमतरता भासत होती. पण हळूहळू दर शनिवारच्या बैठकीत यावर चर्चा होऊन एकमेकांच्या कल्पना लक्षात घेऊन घरच्या साहित्यातून पाठ घेणे सोपे जाऊ लागले. हे चित्रवाणी पाठ मुलांना आवडतात. भाजी निवडणे, केर काढणे, छोट्या कपड्यांच्या घड्या घालणे अशा कामात मुले आईला मदत करतात. यामुळे मुलं घरात रमतात. काही पालकांनी मुलांचे चित्रीकरण (व्हिडिओ) करून पाठवले. त्यात वेदांतने रंगांचा व चवींचा परिचय करून दिला, हिनाने स्वतःच्या नावावर व शाळेच्या नावावर शेंगदाणे आकाराप्रमाणे व्यवस्थित लावले.

५ सप्टेंबरला शिक्षक दिनानिमित्त पालकांच्या मदतीने मुलांनी घरी काही पाठ घेतले. ओवीने भातुकलीच्या भांड्यांचा परिचय करून दिला. २६ सप्टेंबरला ऑनलाईन पालकसभा झाली (उपस्थिती ६०). पालकांनी त्यांचे मनोगत व्यक्त करताना सर्व शिक्षिकांचे कौतुक केले आणि मुलांना प्रत्यक्ष शाळेत जाण्याची शिक्षिकांना भेटण्याची ओढ लागल्याचे सांगितले. भेकराईनगरचे पालक म्हणाले की, 'मुलं फक्त ताईचेच ऐकतात. त्यांच्या पाठाची वाट बघत असतात.' रोज एक तास घेतलात तर मुलांना आवडेल.



## समुपदेशन विभाग

दि. ६ ऑक्टोबर रोजी मा. बागेश्री पोंक्षे **'मनाचा आरसा'** या विषयावर सर्व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना म्हणाल्या, 'कोणत्याही गोष्टीची उत्साहाने सुरुवात करायला हवी आणि ठरवलेल्या ध्येयासाठी मनापासून प्रयत्न करून कुणाच्या सोबतीची वाट न बघता पुढे जात राहिले पाहिजे.'

**'मुलांचे ऑनलाईन शिक्षण आणि पालकांची भूमिका'** या विषयावर सौ. दीपाली थोरात यांनी घेतलेल्या सत्रात 'शिक्षणात पालकांचा विश्वास खूप महत्त्वाचा आहे. त्यासाठी पालकांनी सातत्याने, चिकाटीने आणि आत्मविश्वासाने मुलांच्या शिक्षणासाठी सजग राहणे, मुलांना वेळ देणे गरजेचे आहे' असे सांगितले.